25-27 march-2017

# "Public Policy and Adminsitration : Issues and Concerns"

**Editor**
**Dr. Nirmal Kumar Singh**



Department of Public Administration & LSG
Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University
&
Maharashtra Public Administration Association

*Jointly organised*
*International Conference*
*On*

# "Public Policy and Administration : Issues and Concerns"

**25-27 March 2017**

**Editor**
**Dr. Nirmal Kumar Singh**
**Head, Department of Public Administration**
**And Local Self Government**
**RTMNU**

**Department of Public Administration & LSG**
**Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University &**
**Maharashtra Public Administration Association**

# "Public Policy and Administration : Issues and Concerns"

**25-27 March 2017**

© No part of this book shall be reproduced, stored in retrieve system, or translated in any form or by any means, electronic, mechanical, photocopying and/or otherwise without the prior written permission of the Editor and Publisher.
The papers included in this publication have been directly reproduced with minimum editorial intervention, from the files sent by the respective authors, opinions expressed in the selected research papers are those of contributors and do not necessarily reflect the views of seminar proceeding publication committee. The editor or institution is not responsible for any consequences relating from any information contained therein.

**ISBN - 978-81-924673-5-1**

◆ Editor
**Dr. Nirmal Kumar Singh**
Head, Department of Public Administration
And Local Self Government
RTMNU

◆ Published by
**Vatsa-vinayak Prakashana, Pune-Nagpur**
78, Ganesh Nagar,
Near S.D. Hospital, Nagpur - 440 009
E-mail : vatsavinayak@gmail.com
Mob. 8390733829

◆ Printed by
**AdArts**
282, Basement Floor, Trimurti Tower,
WHC Road, Laxmi Nagar, Nagpur - 22
Ph. 0712-2244033

■ President International Conference ■

**Dr. Satish Chaturvedi**

■ Editor ■

**Dr. Nirmal Kumar Singh**
Department of Public Administration and LSG
RTMNU, Nagpur

■ Editorial Board ■

**Dr. B.S. Pimple**, Nanded
**Dr. Panchsheel Ekambekar**, Nanded
**Dr. Jitendra Wasnik**, Nagpur
**Dr. Chandrashekhar Gitte**, Nagpur
**Dr. Sanjay Bhalerao, Kannad**, Aurangabad
**Dr. Balaji Katturwar, Deglur**, Nanded

■ Peer Review Committee ■

**Dr. M.C. Pawar**, Aurangabad
**Dr. Pratibha Patil**, Aurangabad

| | | |
|---|---|---|
| 39. | आर्थिक धोरण आणि विकास<br>◆ डॉ. एस.एस. बिरंगणे | 164 |
| 40. | मानवाधिकार आणि सामाजिक न्यायाची : संविधनात्मक चिकित्सा<br>◆ डॉ. प्रमोद त्र्यंबकराव चव्हाण | 168 |
| 41. | मानवी हक्क आणि सामाजिक न्याय<br>◆ एम.व्ही. चावरे | 174 |
| 42. | मानवी हक्क व सामाजिक न्याय (विशेष संदर्भ :- भारत)<br>◆ डॉ. दिलीप लालुप्रसादजी बंजारा | 176 |
| 43. | महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समितीचा अहवालाचे अवलोकन : विशेष संदर्भ मराठवाडा<br>◆ डी.के. कटके | 179 |
| 44. | मानवी हक्क आणि विकास<br>◆ डॉ. आशा नरसिंग गित्ते | 182 |
| 45. | मानवी हक्क आणि सामाजिक न्याय<br>◆ डॉ. सय्यद कुरेशाबी नजीरसाब | 187 |
| 46. | हवामान बदलाची कारणे व उपाय : एक अध्ययन<br>◆ डॉ. अशोक सोनकांबळे | 190 |
| 47. | स्त्रीयांवरील अत्याचार आणि मानवी हक्कांचे उल्लंघन<br>◆ डॉ. पंचशील एकंबेकर<br>◆ संजय देबडे | 193 |
| 48. | राष्ट्रीय आरोग्य धोरण : एक मुल्यमापन<br>◆ डॉ. रमेश सदाशिव वाघमारे<br>◆ डॉ. संजय गोविंदराव कांबळे | 197 |
| 49. | सार्वजनिक धोरणात समाविष्ट असलेले गतीशिलतेचे घटक<br>◆ गजानन डी. चित्तेवाड | 200 |
| 50. | महाराष्ट्राच्या कृषी व औद्योगिक विकासात शासनाची भुमिका<br>◆ डॉ. प्रतिभा उन्हाळे | 204 |
| 51. | मानवी हक्क व सामाजिक न्याय<br>◆ एस.डी. दिक्षीत | 208 |


ISBN - 978-81-924673-5-1

# स्त्रीयांवरील अत्याचार आणि मानवी हक्कांचे उल्लंघन

प्रा. डॉ. पंचशील एकंबेकर

प्रा. संजय देवडे

भारतात स्त्रियांवरील अत्याचारात मोठ्या प्रमाणात वाढ होत असून दररोजच्या जीवनात स्त्रियांवरील अत्याचार व शोषणाच्या घडणा–या घटना या देशाचे कटू विदारक सत्य बनले आहे. एकीकडे आपण स्त्रि–पुरुष समानता आणि व्यक्तीची प्रतिष्ठा या मुल्यांचे गुण गातो तर दुसरीकडे स्त्रियांचा विषय समोर आला की, आपण या मुल्यांकडे दुर्लक्ष करतो. प्रस्तुत लेखात स्त्रियांच्या हक्कांबाबत घटनात्मक व कायदेशिर तरतूदी, मानवी हक्कांच्या उल्लंघनाचे स्वरुप व सद्यःस्थिती यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

महिलांच्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाचे विश्लेषण करण्यासाठी खालील उद्दिष्ट्ये निर्धारित करण्यात आलेली आहेत.

१. महिला हक्कांच्या संरक्षणासंदर्भात घटनात्मक व कायदेशिर तरतुदींचा अभ्यास करणे.
२. स्त्रियांवरील अत्याचाराच्या सद्यःस्थितीचा अभ्यास करणे.
३. स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रकरणे हाताळणा–या प्रशासकीय यंत्रणांचा अभ्यास करणे.

**प्रस्तावना:**

मानवी हक्क हे मानवी जीवनाचे अविभाज्य भाग आहेत. प्रत्येक व्यक्तीला मनुष्य प्राणी या नात्याने हे हक्क नैसर्गिकरित्या प्राप्त झाले आहेत. मानवी हक्कांशिवाय कोणत्याही व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास करुन घेणे व गुणवत्तापूर्ण जीवन जगणे शक्य नाही. केवळ व्यक्ती विकासासाठी मानवी हक्क महत्वाचे नसून संपूर्ण समाज व देशाच्या विकासाच्या प्रक्रियेत मानवी हक्क अत्यंत महत्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे आज जगातील जवळपास सर्वच देश मानवी हक्कांचे जोरदार समर्थन करीत आहेत. मानवी हक्कांच्या प्रचार–प्रसार व त्याच्या संरक्षणाशिवाय सुखी समाजाची कल्पना करणे एक स्वप्नच ठरेल. म्हणून सुखी व सुदृढ समाजाच्या निर्मितीसाठी शासनाद्वारे आपल्या नागरिकांना मानवी हक्क तर प्रदान केलेच पाहिजे, पण त्याच बरोबर त्या हक्कांचे उल्लंघन होणार नाही याचीही हमी देणे आवश्यक आहे. जागतिक पातळीवर संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेपासूनच मानवी हक्कांना विशेष महत्व देण्यात आलेले आहे. संयुक्त राष्ट्राच्या सनदेत मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्य यांचा आग्रह धरण्यात आला असून त्याच्या प्रस्थापनेसाठी प्रयत्नशिल राहण्याचा निर्धार केला आहे. तसेच स्त्री–पुरुषांच्या समान हक्कांच्या तत्वाचा समावेश करुन लिंगभेद विचारात न घेता सर्वांना समान मानवी हक्क मिळाले पाहिजेत असे नमुद केले आहे. तसेच अनेक जागतिक महिला परिषदेच्या माध्यमातून स्त्री–पुरुष समानता निर्माण करण्याच्या दृष्टीने युनोने अनेक कार्यक्रम हाती घेतले आहेत. त्यानुसार जगातील देशांनी विशेषत: दुस–या महायुध्दानंतर स्वतंत्र झालेल्या अशियायी व आफ्रिका खंडातील देशांनी आपापल्या देशाच्या राज्यघटनेमध्ये नागरिकांच्या मानवी हक्कांची तरतूद केली आहे.

**स्त्री हक्कांच्या संरक्षणाबाबत घटनात्मक व कायदेशिर तरतूदी:**

भारतीय राज्यघटनेमध्ये स्त्रियांच्या हक्कांसबंधी आणि त्यांच्या हितरक्षणासंबंधी अनेक महत्वाच्या तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाची हमी देण्यात आली आहे. भारतीय राज्यघटनेतील तिस–या भागात कलम १४ ते ३२ मध्ये नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला आहे. यातील कलम १४ हे भारतीय नागरिकांना समतेचा

ISBN - 978-81-924673-5-1

हक्क प्रदान करते. यानुसार प्रत्येक व्यक्ती कायद्यापुढे समान असून प्रत्येकाला कायद्याचे समान संरक्षण प्राप्त आहे. तसेच कलम १५ नुसार नागरिकांमध्ये धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या पैकी कोणत्याही आधारावर भेदाभेद करण्यास प्रतिबंध आहे. तसेच कलम १६ नुसार सर्व नागरिकांना संधीची समानता प्रदान करण्यात आली आहे. याशिवाय कलम १८ नुसार स्वातंत्र्याचा हक्क, कलम २१ नुसार शोषणाविरुदचा हक्क, धार्मिक स्वातंत्र्यच हक्क, सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क आणि घटनात्मक उपाययोजनाचा हक्क या हक्कांचाही अंतर्भाव आहे.

तसेच नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यात कलम ५१ अ मध्ये महिलांना समानतेची वागणूक देण्यासंबंधी आणि त्यांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासंबंधी उल्लेख आहे. तसेच राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्वांमध्येही स्त्री–पुरुष समानता आणि स्त्रियांचे रक्षण यावर भर दिल्याचे दिसते.

**महिलाभिमूख कायदे:**

भारताने घटनात्मक तरतूदी बरोबरच महिलांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या हक्कांच्या रक्षणासाठी अनेक महत्वाचे कायदेही करुन ते लागू केले आहेत. या महिलाभिमूख कायद्याचे दोन प्रकारांत वर्गीकरण केले जाते.

**अ. भारतीय दंड संहिता अंतर्गत महिला विरोधी गुन्हयांची तरतूद:**

१. बलात्कार–कलम ३७६
२. बलात्काराचा प्रयत्न – कलम ३७६/५११
३. महिलांचे अपहरण– कलम ३६३,३६४,३६१ते ३६९
४. हुंडाबळी – कलम ३०४ बी
५. महिलांवरील प्राणघातक हल्ला व विनयभंग– कलम३५४
६. महिलांसोबत असभ्य वर्तन – ३५६
७. पती किंवा त्याच्या नातेवाईकाकडून छळ, दुष्कर्त्य– कलम४९८ ए
८. अनैतिक व्यापारासाठी विदेशातून मुलिंची आयात – कलम ३६६ बी
९. आत्महत्येस प्रवृत्त करणे – कलम ३०६

**ब. विशेष कायदे:**

१. अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६
२. हुंडाबंदी कायदा १९६१
३. स्त्रियांचे असभ्य प्रदर्शन प्रतिबंध कायदा १९८६
४. सतीप्रथा प्रतिबंध कायदा १९८७
५. कौटूंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे रक्षण कायदा २००५
६. बालविवाह बंदी कायदा २००६
७. राष्ट्रीय महिला आयोग कायदा १९९० इत्यादी.

भारताने महिलांचे सक्षमीकरण व त्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी १९९० साली कायदा करुन राष्ट्रीय महिला आयोगाची १९९२ मध्ये स्थापना केली. केंद्रा बरोबरच राज्य सरकारने देखील आपल्या राज्यात राज्य महिला आयोगाची स्थापना केली असून हे आयोग महिलांचे हक्क व हितांचे रक्षण करण्याच्या अनुषंगाने कार्य करीत आहे. याशिवाय भारताने महिलांच्या विकासासाठी व सशक्तीकरण करण्यासाठी अनेक कार्यक्रम हाती घेतले असून त्यापैकी एक महत्वाचे म्हणजे महिलांना ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार स्थानिक शासनामध्ये दिलेले ५० टक्के राजकीय आरक्षण व शासकीय सेवेत दिलेले आरक्षण होय. या आरक्षणाच्या तरतूदीमुळे आज महिलांचा देशाच्या राजकीय–प्रशासकीय प्रक्रियेत मोठया प्रमाणात सहभाग वाढला असून त्यांनी आपली योग्यता आणि क्षमता सिध्द केली आहे. आज महिला पुरुषांच्या खाद्यांला खांद्या लावून विकासाच्या सर्व क्षेत्रात कार्य करताना दिसत आहेत.

ISBN - 978-81-924673-5-1

**स्त्रियांवरील अत्याचार:** वरीलप्रमाणे भारताने महिलांच्या हक्क व हिताच्या रक्षणासाठी व महिलांच्या विकासासाठी विविध प्रकारचे कायदे करुन व योजना आखुन त्याची अंमलबजावणी केली जात आहे. असे असले तरी भारतात महिलांवर सातत्याने अत्याचार होत असून महिलांवरील अत्याचाराच्या घटनेत सतत वाढ होत असल्याचे दिसते. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभाग २०१५ नुसार स्त्रियांवरील अत्याचाराच्या २०१५ मध्ये ३२७३९४ घटनांची नोंद झाली असून २०१४ च्या ३३७९२२ घटनांच्या तुलनेत ३.१% घट झाल्याचे दिसते. स्त्रियांविरुद्धच्या गुन्हयात वर्ष २०११–२०१४ मध्ये सातत्याने वाढ झाल्याचे दिसते. २०११ मध्ये २२८६५० प्रकरणे, २०१२मध्ये त्यात वाढ होउन २४४२७० प्रकरणे, २०१३ मध्ये ३०९५४६ प्रकरणे, २०१४ मध्ये ३३७९९२ प्रकरणे घडली आहेत.

**गुन्हयांचा दर : (Crime Rate)** भारतामध्ये स्त्रियांविरुध्दच्या गुन्हयांचा दर हा NCRB २०१५ नुसार दर एक लाख स्त्रियांमागे ५३.९% इतका आहे. स्त्रियांविरुध्द सर्वात जास्त गुन्हयाचा दर हा १८४.३% दिल्लीचा असून तेथे एकूण १७१०४ गुन्हयांची नोंद झाली आहे. सरासरी दर दोन दिवसाला एक महिला दिल्लीमध्ये अत्याचाराला बळी पडते. तर दुस—या स्थानी १४८.२%: दरासह असाम दुस—या स्थानी तर तेलंगना ८३% दरासह तिस—या स्थानी आहे. देशातील एकूण स्त्रियाविरुध्दच्या गुन्हयांमध्ये ३५५२ प्रकरणांसह उत्तर प्रदेशचा सर्वात जास्त १०.९% इतका वाटा असून पश्चिम बंगालचा ३३४८ प्रकरणांसह १० : इतका वाटा आहे.

**बलात्कार :** भारतामध्ये NCRB २०१५ च्या आकडेवारी नुसार दर दोन मिनिटाला एक बलात्काराचे प्रकरण घडत असून २०१५ मध्ये ६४६५१ इतक्या बलात्काराच्या गुन्हयांची नोंद झाली असून २०१४ च्या तुलनेत ३६७३३ प्रकरणांसह ५.७% नी घट झाल्याचे दिसते. तसेच सामुहिक बलात्काराच्या २०१५ मध्ये २११३ घटना घडल्या असून २०१४ च्या २३४६ घटनांच्या तुलनेत किंचित घट झाल्याचे दिसते. तसेच उपरोक्त बलात्काराच्या एकूण प्रकरणातील आरोपी पैकी ९५% आरोपी हे पिडीत महिलेच्या परिचयातील असल्याचे दिसून येते.

**स्त्रियांचे अपहरण:** स्त्रियांचे अपहरण करणे व पळवून नेण्याच्या घटनांमध्ये देखील २०१५ मध्ये वाढ झाली असून एकूण ५९२७७ अपहरणांच्या घटनांची नोंद झाली आहे. २०१४ च्या ५७३११ घटनांच्या तुलनेत ३.४% इतकी वाढ झाल्याचे दर्शवते. शासनाच्या आकडेवारीनुसार विवाहासाठी बळजबरीने स्त्रियांना पळवून नेणे हे या अपहरणामागचे मूळ कारण असल्याचे स्पष्ट होते. एकूण स्त्री अपहरणांच्या घटनांपैकी ५४% घटना या बळजबरीने विवाह करण्याच्या उद्देशाने घडल्या आहेत.

**हुंडाबळी:** भारतात स्त्रियांवर होणा—या अत्याचाराचे एक भयानक व अमानवी कृत्य म्हणजे हुंडाबळी होय. भारतात दर पाच मिनिटाला हुंडाबळीची एक घटना घडते. २०१५ च्या आकडेवारीनुसार हुंडाबळीच्या ७६३४ घटना घडल्या असून उत्तर प्रदेशात सर्वात जास्त २३३५ म्हणजे ३०% हुंडाबळीच्या घटना घडल्या आहेत. तर बिहार मध्ये ११५४ हुंडाबळी गेलेल्या आहेत. हुंडयासाठी छळाच्या घटना २०१५ मध्ये ९८१४ इतक्या घटना घडल्या असून २०११—२०१४ मध्ये या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे दिसते.

**कौटूंबिक हिंसाचार :** भारतामध्ये स्त्रियांना कुटूंबात जाणीवपूर्वक मानसिक व शारीरिक त्रास देउन त्यांचा छळ केला जातो. उदाहरणार्थ आपमानित करणे, तुच्छ लेखने, शारीरिक इजा करणे इत्यादी. अशा कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे रक्षण करण्यासाठी भारताने कौटूंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा २००५ केला असून देखील कौटूंबिक हिंसाचाराच्या घटना मोठया प्रमाणात घडत असतात. परंतु अनेक कारणामुळे पिडीत महिला या संबंधीची तक्रार संबंधित यंत्रणेकडे करत नाहीत. हे खालील आकडेवारीवरुन लक्षात येते.

ISBN - 978-81-924673-5-1

२०१५ मध्ये कौटुंबिक हिंसाचाराच्या ४६१ घटनांची नोंद झाली असून २०१४ च्या ४२६ घटनांच्या तुलनेत त्यामध्ये ८.२% नी वाढ झाल्याचे दिसून येते.

**विनयभंग, छेडछाड आणि लैंगिक छळ:** एखाद्या स्त्रिला लज्जा वाटेल असे कृत्य करणे, शब्द उच्चारणे, अंगविक्षेप करणे, शारीरिक संबंध ठेवण्यासाठी दडपण टाकणे इत्यादी प्रकार हे विनयभंग, छेडछाड व लैंगिक छळांच्या घटनांत समाविष्ट होतात. अशा प्रकारच्या दुष्कृत्यामुळे स्त्री ही शारीरिक व मानसिकदृष्ट्या खचून जाते. स्त्रियांच्या छेडछाड व विनयभंगाच्या घटनात देखील दिवसेदिवस वाढ होत असून २०१५ मध्ये ८२४२२ घटनांची नोंद झाली असून मागील वर्षीच्या ८२२३५ घटनांच्या तुलनेत०.२% नी वाढ झाली आहे. सन २०११ च्या तुलनेत या घटनामध्ये २०१५ मध्ये दुपटीने वाढ झाली असल्याचे दिसते.

**पोलिस यंत्रणा व गुन्हयांची तपासणी** : पोलिस यंत्रणेकडे २०१५मध्ये स्त्रियांच्या विरुद्धच्या गुन्हयांची एकूण ४७१३२७ प्रकरणे तपासणीसाठी होती त्यापैकी ३१४०७८ प्रकरणांची तपासणी २०१५ अखेर पोलिसांनी पूर्ण केली असून २४५३४१ प्रकरणांत पोलिसांनी आरोपपत्र दाखल केले आहे. सदरील आकडेवारीवरुन आरोपपत्र दाखल करण्याचा दर हा ८९.४% इतका दिसून येतो.

**न्यायालयाद्वारे खटल्यांचा न्यायनिवाडा:** वर्ष २०१५ अखेर महिला विरुद गुन्हयांची एकूण १२२७१८७ प्रकरणे न्यायालयात चालू असून त्यापैकी २७८४४ प्रकरणांत आरोपीना न्यायालयाद्वारे शिक्षा झाली असून एकूण १०८०१४४ प्रकरणे हे न्यायालयात प्रलंबित असल्याचे दिसते. न्यायालयात प्रलंबित खटल्यांचे प्रमाण हे ८८% इतके आहे.

वस्तुत: भारतातील एकूण प्रलंबित खटल्यांची संख्या आणि न्यायिक प्रक्रिया पाहता महिलांना त्यांच्यावरील अत्याचार संबंधीत प्रकरणात लवकर न्याय मिळेल अशी स्थिती दिसून येत नाही.

**सारांश :**

स्त्री अत्याचार व मानवी हक्कांचे उल्लंघन यांचा संबंध स्पष्ट करीत असताना वरील आकडेवारीवरुन विविध स्वरुपात स्त्रियांवर अत्याचार कशा प्रकारे वाढत आहेत याची वस्तुस्थिती समोर येते. भारतीय समाजात महिलांना शक्ती, माता, देवी इत्यादी म्हणून गौरविले जाते पण तिच्याकडे एक माणूस म्हणून पाहिले जात नाही. हे वरील अत्याचाराच्या आकडेवारीवरुन स्पष्ट होते. अधुनिक काळात स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात आपली योग्यता व क्षमता सिध्द केली असली तरी पुरुषसत्ताक मानसिकता आजही बदलण्यास तयार नाही त्यामुळे स्त्रियांवरील होत असलेल्या अत्याचारामुळे मानवी हक्कांचे उल्लंघन होत असल्याचे स्पष्ट होते.

**संदर्भ:**


१. पाटील व्ही. बी., मानवी हक्क, २००९ के सागर प्रकाशन पुणे.
2- Basu D.D. Introduction to Indian Constitution, 2012 Wadhwa & Wadhwa Pub. Nagpur.
3- National Crime Record Bureau Repot 2014 & 2015 Govt. of India New, Delhi
4- Sharma India, Violence against Women- Where are the Solutions? Indian Journal of Psychiatry, April-June 2015.
5- http: //Indianexpress.com /article/national-crime-record-bureao-data-2015-slight-dip-in-crime-against-women
6- Shinde Sunil, Violence of Women Rights: A case of India Women, Article published in conference proceeding.


■ वसंतराव नाईक महाविद्यालय नांदेड
■ देगलूर महाविद्यालय देगलूर

ISBN - 978-81-924673-5-1